महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ २२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ २२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक १४४७(२)/२०२०/वीस दिनांक:- ३१ मे, २०२२

# प्रसिध्दीपत्रक

**विषय :- राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२० अंतिम निकालाबाबत**

**संदर्भ :- पूर्व परीक्षा जाहिरात क्र. १९/२०१९ व मुख्य परीक्षा जाहिरात क्र. ६०/२०२१ तसेच आयोगाचे समक्रमांकाचे दिनांक २९ एप्रिल, २०२२ रोजीचे प्रसिध्दीपत्रक**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे दिनांक ४, ५ व ६ डिसेंबर, २०२१ रोजी घेण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२० चा अंतिम निकाल दिनांक ३१ मे, २०२२ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यानुसार एकूण २०० पदावर उमेदवारांची शिफारस करण्यात येत आहे.

२. सदर परीक्षेमध्ये **श्री. चौगुले प्रमोद बाळासो** बैठक क्रमांक ( PN005337) हे राज्यातून सर्वसाधारण उमेदवारांमधून, **श्रीमती माने रूपाली गणपत** बैठक क्रमांक (PN002157) या महिलांमधून तसेच **श्री. परेकर गिरीश विजयकुमार** बैठक क्रमांक (PN002362) हे मागासवर्ग उमेदवारांमधून राज्यात प्रथम आले आहेत.

३. उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गासाठी शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (सीमांकन रेषा) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत.

४. प्रस्तुत परीक्षेची सर्वसाधारण गुणवत्ता यादी दिनांक २९ एप्रिल, २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणा-या उमेदवारांबाबत प्रस्तुत परीक्षेच्या जाहिरातीच्यावेळी अस्तित्वात असलेल्या नियमानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

५. प्रस्तुत निकालाद्वारे शिफारसपात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांच्या शिफारशी विषयांकित परीक्षेच्या आवेदनपत्रातील दाव्यांच्या पृष्ठर्थ नियुक्तीच्यावेळी त्यांची पात्रता मूळ प्रमाणपत्रांवरून तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. उमेदवारांनी आवेदनपत्रात दिलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास, अथवा आवेदनपत्रातील दाव्यानुसार आवश्यक प्रमाणपत्राची पूर्तता नियुक्तीच्यावेळी न केल्यास तसेच शासनस्तरावर अधिसूचनेतील तरतुदीनुसार दावे तपासतांना व अन्य कारणामुळे अपात्र ठरणा-या संबधित उमेदवारांची उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

६. प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या व अन्य मुद्दयांसंदर्भात विविध मा. न्यायालयात / मा. न्यायाधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणातील अंतिम न्याय निर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात येत आहे.

७. प्रस्तुत निकालानुसार दिव्यांग, अनाथ, खेळाडू, मागास इत्यादीसाठी आरक्षित पदावर शिफारसपात्र उमेदवारांची शिफारस सक्षम प्राधिकरणाकडून तपासणी करण्याच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

८. प्रस्तुत निकालाच्या आधारे शिफारस पात्र न ठरलेल्या उमेदवारांना उत्तरपुस्तिका/ उत्तरपत्रिकेतील गुणांची पडताळणी करावयाची असल्यास गुणपत्रके त्यांच्या प्रोफाईलमध्ये उपलब्ध झाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसात आयोगाकडे ऑनलाईन पद्धतीने विहित पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे. यासंदर्भात आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचनांमधील सूचना क्रमांक ६.४.४. चे कृपया अवलोकन व्हावे.

ठिकाण :- मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर राजपत्रित परीक्षा)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.